ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ४ जून १९५२ अंक १३

## विविध माहिती

**पोलादाचा नवा कारखाना**— भारत सरकार पोलादाचा एक नवा कारखाना उभारण्याचा विचार करीत आहे. हा कारखाना ओरिसांत अगर मध्य-प्रदेशांत उघडण्यांत येईल, असें समजतें.

**विजेचें सहकारी केंद्र**— उत्तर प्रदेशांतील इटावा जिल्ह्यांतील एका गांवानें सहकारी प्रयत्नानें विजेचें केंद्र उघडण्याचें ठरविलें आहे. ह्या निर्मिति-केंद्रासाठी गांवकऱ्यांनीं ७ लाख रुपये जमविण्याचा संकल्प केला आहे. वीज-निर्मीति सुरू झाल्यावर दिव्यांची सोय तर होईलच; पण शिवाय खेड्याच्या आसपासच्या भागांत पिण्याच्या पाण्याचाहि पुरवठा होईल.

**बेकारी विमा फंड**— अमेरिकन सरकारच्या मजूर खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, १९५१ साल अखेर बेकारी विमा फंडाची रक्कम आतांपर्यंत सर्वांत अधिक म्हणजे ८०० कोटी डॉलर्स झाली आहे.

**प. बंगालमध्यें अफूचें वाटप**— प. बंगाल सरकारनें येत्या ऑगस्टपासून अफूच्या विक्रीचें वांटप करण्याचें ठरविलें आहे. अफू-बंदी करण्याच्या योजनेंतील हें पहिलें पाऊल आहे. अफूबंदी पूर्णपणें अंमलांत आल्यावर सरकारचें वार्षिक ९९ लाख रुपयांचें उत्पन्न बुडेल.

**रशिआंतील सिनेमागृहांत वाढ**— रशिआंतील खेड्यांतून १,५०० नवीं सिनेमागृहें उघडण्यांत येणार आहेत. सध्यां रशिआंतील ग्रामीण भागांत १५,००० रजतपटावर शास्त्रीय चित्रपट, अनुबोध-पट, वगैरे दाखविण्यांत येतात. एका ठिकाणीं स्थिर न रहाणाऱ्या धनगरांना सुद्धा फिरत्या सिनेमा-मोटारींच्या साह्यानें चित्रपट दाखवितात.

**गौरीशंकरावरील आणखी एक स्वारी**— अर्जेंटायनामधील गिर्यारोहकांची एक टोळी पुढील वर्षीं गौरीशंकर शिखरावर चढण्याचा प्रयत्न करणार आहे. प. गोलार्धांतील अँडीज पर्वताच्या अधिकांत अधिक उंच असणाऱ्या शिखरावर ५ वेळा झेंडा फडकाविलेला एक अनुभविक आरोहक ह्या टोळीचा नेता आहे. हें शिखर २३,०८१ फूट उंच आहे.

**कलकत्त्यांत छोट्या टॅक्सीज**— कलकत्त्यांत सध्यां १,५०० भाड्याच्या मोटारी आहेत. त्यांच्या भरीला आतां ६० छोट्या भाड्याच्या मोटारी येणार आहेत. मोठ्या गाड्या मैलाला १ रुपया घेतात. छोट्या गाड्या मैली ६ आणे घेतील आणि तीन उतारूंना घेऊन जातील.

**विंध्य प्रदेशांत कोळसा**— भारतीय सरकारच्या नॅशनल फ्युएल रिसर्च इन्स्टिटयूटनें केलेल्या पहाणींत असें आढळून आलें आहे कीं मध्य-प्रदेशांत व विंध्य-प्रदेशांत कोळसा, लोखंड आणि चुनखडी ह्यांच्या मोठाल्या खाणी सांपडण्याचा संभव आहे. ह्या कोळशापासून जळणाचें कृत्रिम तेल तयार करतां येण्यासारखें आहे.

**रोममध्यें नवी वेधशाळा**— रोममध्यें सूर्याचें निरीक्षण करण्यासाठी १०० फूट उंचीची एक नवीन वेधशाळा बांधण्यांत येत आहे. ह्या वेधशाळेच्या खालच्या मजल्याच्या खोलींत अनेक आरशांच्या साह्यानें एका पडद्यावर सूर्याचें प्रतिबिंब पाडण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

**उत्तर-प्रदेशांत कागदाचा कारखाना**— उत्तर-प्रदेश सरकारनें आपल्या राज्यांत वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. त्यासंबंधींची योजना भारतीय सरकारला सादर करण्यांत आली आहे. उत्तर-प्रदेशांतील हिमालयाच्या जंगलांत कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल भरपूर मिळेल असें म्हणतात.

**अमेरिकन संस्थांची मदत**—९ जुलै, १९५१ ते १२ मे, १९५२ पर्यंत अमेरिकेंतील खाजगी संस्थांनीं अन्न व औषधें मिळून भारताला २,५०,००० पौंड किंमतीचा माल पाठविला. त्याचें वजन २८,९४,७४४ पौंड भरलें.' हा माल भारताला ३५ बोटींतून आणण्यांत आला आणि तो मुंबई, मद्रास व कलकत्ता बंदरांत उतरविण्यांत आला.

**शेतकरी-कर्ज कायद्यांत दुरुस्ती**— १९४७ च्या शेतकरी कर्ज-कायद्यांत दुरुस्ती करून ह्यासंबंधींच्या खटल्यांत वकिलांना काम करण्याची जी मनाई करण्यांत आली होती ती काढून टाकण्याचा विचार मुंबई-सरकार करीत आहे. ह्या कायद्याच्या ४२ व्या कलमांत दुरुस्ती करण्यांत येणार आहे. हायकोर्टानें ह्या बाबतींत व्यक्त केलेल्या मताचा हा परिणाम आहे.

**ब्रिटनच्या राजघराण्याचा तनखा**—१६९७ सालापासून ब्रिटनच्या राजघराण्याला आपला तनखा पार्लमेंटमध्यें सिव्हिल लिस्ट ह्या सदराखाली मंजूर करून घ्यावा लागतो. गादीवरील व्यक्ति मेल्यावर तनखा ६ महिनेपर्यंत आपोआपच चालू रहातो, नंतर मात्र नवी मंजुरी घ्यावी लागते. सहावे जॉर्ज ह्यांच्या कारकीर्दींत दरवर्षीं ४,१०,००० पौंड तनखा मिळत असे. त्यापैकीं ३,००,००० पौंड खाजगी नोकरांचे पगार व घरखर्च ह्यासाठीं व १,१०,००० पौंड वैयक्तिक खर्चांकडे जात.

## हिंदी लोकसंख्येची छाननी

१९५१ च्या शिरगणतीचे पक्के आकडे तयार झाले आहेत, त्यावरून खालील माहिती मिळते:—

| | |
|---|---|
| एकूण लोकसंख्या : | ३५,६८,२९,४८५ |
| पुरुष : | १८,३३,०५,६५४ |
| स्त्रिया : | १७,३५,२३,८३१ |
| स्त्री–पुरुषांचें प्रमाण : | ९४७ स्त्रिया : १,००० पुरुष |
| १९४१ चे मानानें लोकसंख्येंत वाढ : | १२·५% |
| सर्वांत ज्यास्त वाढ : | मुंबई राज्यांत, २०·८% |
| शहरी वस्ती : | ६,१८,२५,२१४ |
| खेडेगांवी वस्ती : | २९,५०,०४,२७१ |
| एकूण लोकसंख्येंत शहरी संख्या : | १७·२% |
| खेडेगांवी संख्या | ८२·८% |

### शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या

| | |
|---|---|
| स्वतःच्या सर्वस्वीं मालकीची किंवा बव्हंशीं मालकीची जमीन करणारे व त्यांचे कुटुंबीय | १६ कोटी, ७२ लक्ष |
| स्वतःच्या मालकीची जमीन नसून ती करणारे व त्यांचे कुटुंबीय | ३ कोटी, १५ लक्ष |
| जमिनीवर राबणारे मजूर व त्यांचे कुटुंबीय | ४ कोटी, ४७ लक्ष |
| खंड घेणारे जमिनीचे मालक व त्यांचे कुटुंबीय | ५२ लक्ष |

### बिगर–शेतीवर चरितार्थ करणारी लोकसंख्या

| | |
|---|---|
| उत्पादनावर चरितार्थ चालविणारे व त्यांचे कुटुंबीय | ३ कोटी, ७६ लक्ष |
| व्यापारावर अवलंबून असणारे व त्यांचे कुटुंबीय | २ कोटी, १२ लक्ष |
| वहातुकीवर अवलंबून असणारे व त्यांचे कुटुंबीय | ५६ लक्ष |
| इतर | ४ कोटी, २८ लक्ष |

---

### पाकिस्तानच्या आर्थिक परिस्थितींत अचानक बदल

कच्च्या मालाच्या जागतिक किंमतींत गेल्या दोन महिन्यांत घट झाल्यामुळें, पाकिस्तानाची परराष्ट्रीय व्यापाराची घडी विघडली आहे. ताग व कपास ह्यांच्या निर्गतीपासून पाकिस्तानाला त्याची ८०% परराष्ट्रीय हुंडणावळ मिळते. ह्या दोन प्रकारच्या मालास परदेशांत बाजारपेठ पूर्ववत राहिलेली नाहीं; लोकर, चहा, कातडी, इत्यादि निर्गतींच्या मालाचीहि अशीच बिकट परिस्थिति आहे. पाकिस्तानाची आर्थिक घडी गेल्या कांहीं आठवड्यांत विघडली असून, पाकिस्तानी रुपयाची मजबुती टिकून रहाणें अशक्य होणार आहे. पाकिस्तानचें धोरण बदलणें अपरिहार्य आहे, असें मत व्यक्त केलें जात आहे.

---

### नॅ. से. सर्टिफिकेटांच्या हट्टामुळें ३½ लक्ष रुपयांचें नुकसान

१९४९–५० मध्यें गिरणीकामगारांना बोनसची द्यावयाची रक्कम १२ वर्षें मुदतीच्या नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकिटांचे स्वरूपांत द्यावयाचें ठरलें होतें. ह्या सर्टीफिकेटांची रक्कम पहिल्या बारा महिन्यांत काढता येत नाहीं. परंतु ही अट रद्द करण्यांत आली, त्यामुळें दिलेल्या २·१० कोटी रुपयांच्या सर्टीफिकेटांपैकीं २·०३ कोटी रुपयांच्या सर्टीफिकेटांची रक्कम कामगारांनीं तातडीनें काढून घेतली. ह्या खटाटोपामुळें सरकारचें साडेतीन लक्ष रुपये नुकसान झालें, असें पोस्ट व तार खात्याच्या १९४९–५० च्या ऑडिट रिपोर्टांत नमूद करण्यांत आलें आहे.

### चार ओळींच्या कवितेची किंमत

बर्लिन शहरांत नुकताच एक मनोरंजक लिलांव पुकारण्यांत आला होता. इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचीं पत्रें अगर त्यांच्या सह्या असलेले जुने कागदपत्र ह्यांचा तो लिलांव होता. लिलावांत निरनिराळ्या इतिहासप्रसिद्ध व्यक्तींच्या हस्ताक्षरांसाठी जे सवाल बोलण्यांत आले त्यावरून असें दिसून आलें कीं राजकारणी पुरुष अगर मुत्सद्दी ह्यांच्या हस्ताक्षरांपेक्षां कवींच्या हस्ताक्षरानें लोकांना अधिक मोह पाडला. पहिल्या प्रथम, अमेरिकेचे दोन वेळां अध्यक्ष झालेले मि ॲन्ड्रयू जॅक्सन ह्यांचें एक पत्र लिलांवासाठी पुकारण्यांत आलें. १९ व्या शतकांत मि. जॅक्सन हे अमेरिकन अध्यक्षपदासाठी दोनदां निवडून आले होते. त्यांच्या पत्राला ७ पौंड किंमत आली. थॉमस जेफर्सन ह्यांच्या एका पत्राला १७ पौंड किंमत आली आणि जॉर्ज वॉशिंग्टन ह्यांच्या पत्राला २६ पौंड किंमत आली. त्यानंतर बाल्झॅक, रॅसीन, लाफॉंटेन आणि चॉपिन ह्या साहित्तिकांचीं पत्रें लिलांवासाठी पुकारण्यांत आलीं. ह्यावेळीं वाङ्मयाच्या चहात्यांनीं आपले खिसे अधिक खुषीनें रिकामे केले. चॉपिनच्या पत्राला ३० पौंड किंमत आली आणि इतरांच्या पत्रांना प्रत्येकीं ४० पौंड किंमत आली. सर्वांत अधिक किंमत सुप्रसिद्ध जर्मन कवि गटे ह्यांच्या एका चार ओळींच्या कवितेला आली. जर्मन लोकांच्या राष्ट्राभिमानाचाहि हा परिणाम असेल. ह्या चार ओळींच्या हस्ताक्षरासाठी एका जर्मन नागरिकानें ६२ पौंड, १० शिलिंग दिले आणि तो कागद आपल्या संग्रहीं घेतला.

---

### पूना हायस्कूल ऑफ कॉमर्सचें यश

पूना हायस्कूल ऑफ कामर्समधून यंदाचे वर्षी १७ विद्यार्थी एस्. एस्. सी. परीक्षेला व्यापारी विषय घेऊन बसले होते. त्यापैकीं १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. पासाचें प्रमाण शेंकडा ५९ पडतें.

यशस्वी विद्यार्थ्यांचीं नांवें:—

| | |
|---|---|
| (१) कु. बावळे पी. पी. | (२) कु. कापसे ए. बी. |
| (३) कु. कुळकर्णी ए. पी. | (४) कुमारी कुंदा मराठे |
| (५) कु. सरपोतदार जी. डी. | (६) कु. वाघ पी. टी. |
| (७) कु. वाळवेकर व्ही. व्ही. | (८) कु. जोशी एम्. डी. |
| (९) कु. मारटकर जी. जी. | (१०) कु. नारायण एस्. व्ही. |


## Deccan Institute of Commerce

*594, Budhwar Peth. Poona, 2.*

Classes for 1952–53 Session will begin on Friday the 20th June 1952. G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (1st)., G. D. C. & A., C. A. I. I. B., Dip. L. A., Shorthand, Type-writing Courses. Morning and Evening classes. Prospectus free on application to the Secretary.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# अर्थ

बुधवार, ता. ४ जून, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत सरकारची कर्जविषयक परिस्थिति

भारत सरकारनें देणें असलेल्या रकमांचा हिशेब केला, तर तें कर्ज १९५२–५३ अखेर २१२३ कोटी रुपये होईल असा अंदाज आहे. १९३८–३९ अखेरच्या आकड्यांशीं केलेली खालील तुलना बोधप्रद होईल:—

( आकडे लक्ष रुपयांचे )

| कर्जाचा तपशील | ३१ मार्च, १९३९ | ३१ मार्च, १९५२ | ३१ मार्च, १९५३ |
|---|---|---|---|
| **भारतांत उभारलेलीं:-** | | | |
| चालू कर्जें | ४३७,८७ | १४०२,१० | १४२७,१० |
| ट्रेझरी बिलें, वेज ॲड मीन्स अडव्हान्सेस | ४६,३० | ३१६,३१ | ३१६,३१ |
| ट्रेझरी डि. रिसटिस | ... | १८,७० | १३,७० |
| स्पे. फ्लोटिंग कर्ज | ... | २१२,६१ | २१२,६१ |
| मुदत संपलेलीं कर्जें | ६५ | ४,९९ | ३,५४ |
| एकूण | ४८४,८२ | १९५४,७१ | १९७३,२६ |
| **इंग्लंडमध्यें उभारलेलीं:-** | | | |
| चालू कर्जें | ३९६,५० | १,२४ | १,१९ |
| युद्ध कर्जें | २०,६२ | २०,६२ | २०,६२ |
| रेल्वे वार्षिक देण्याची एकत्रित रक्कम | ४७,८२ | ८,५३ | ५,५४ |
| मुदत संपलेलीं कर्जें | १ | ९ | ९ |
| एकूण | ४६४,९५ | ३०,४८ | २७,३४ |
| **डॉलरमधील कर्जें:—** | ... ... | ११२,०४ | १११,९४ |
| **सर्व कर्जांची बेरीज:—** | ९४९,४७ | २०९७,२३ | २११२,५४ |

ब्रिटिश युद्ध कर्ज देण्याची जबाबदारी तहकूब झालेली आहे आणि रेल्वे ॲन्युइटीजसाठी दरसाल द्यावयाच्या रकमेस पुरेल एवढी एकत्रित रक्कम ब्रिटिश सरकारला देण्यांत आलेली आहे आणि वेळोवेळीं त्यांतून प्रत्यक्ष रक्कम पौंडांचे स्वरूपांत दिली जात आहे. ह्या दोन बाबी वगळल्या, तर प्रत्यक्ष देणें असलेल्या कर्जाची रक्कम १९५२--५३ अखेर २०८६ कोटी रु. भरेल. १९३८--३९ च्या मानानें ती १२०५ कोटी रु. नीं जास्त आहे.

वरील कर्जाखेरीज, सरकारला इतरहि कित्येक देणीं आहेत. प्रॉव्हिडंट फंडाच्या शिल्लकी रकमा, पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंतील शिल्लका, पोस्ट ऑफिस कॅश आणि नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकिटें, रेल्वेज, पोस्ट व तारखातें ह्यांचे घसारा व रिझर्व्ह फंड, एक्सेस प्रॉफिट टॅक्स व इन्कमटॅक्स ह्यांच्या डिपॉझिट रकमा, ह्या सर्वांची बेरीज १९५२–५३ अखेर ७७६ कोटी रुपये भरेल. नेहेमींचीं कर्जें व ह्या देणें रकमा ह्यांचा एकत्रित विचार केला, तर भारत सरकारचें देणें खालीलप्रमाणें निघतें:—

( आकडे लक्ष रुपयांचे )

| | ३१ मार्च, १९५२ | ३१ मार्च १९५३ |
|---|---|---|
| नेहेमींचीं कर्जें | २०९७,२३ | २११२,५४ |
| इतर देणीं | ७३७,०६ | ७७६,२८ |
| ब्रिटिश युद्ध कर्ज व रेल्वे ॲन्युइटिज | –२९,१५ | –२६,०६ |
| एकूण | २८०५,१४ | २८६२,७६ |

१९३८–३९ अखेरच्या मानानें, भारत सरकारचें देणें १९५१–५२ अखेर १६७० कोटी रुपयांनीं व १९५२–५३ अखेर १७३० कोटी रुपयांनीं वाढलेलें आढळून येईल. रेल्वेज, पोस्ट व तारखातें, दिलेलीं कर्जें, स्टर्लिंग पेन्शन्ससाठीं विकत घेतलेल्या ॲन्युइटीज, इंटरनॅशनल मोनेटरी फंड व जागतिक बँक ह्यांची वर्गणी, पाकिस्तानकडून येणें, रोख व इतर गुंतवणूक, इत्यादींमध्यें कर्जाची रक्कम मुख्यत: गुंतलेली आहे, आणि सुमारें ३३१ कोटी रुपयांच्या कर्जास तारण नाहीं, असें म्हणतां येईल. ह्या रकमेपैकींहि बरीच मोठी रक्कम अनुत्पादक नाहीं.

---

## ग्रामोद्योगांना कर्जें देण्यापूर्वी

उत्तर–प्रदेश चेंबर ऑफ कॉमर्सनें राज्यसरकारला एक खलिता पाठवून ग्रामोद्योगांचा विकास करण्याबद्दल कांहीं सूचना केल्या आहेत. ग्रामोद्योगाला साह्य करावें म्हणून सरकारकडे कर्जासाठी अर्ज करण्यांत येतात. ह्या अर्जांची तपासणी बोर्ड ऑफ इंडस्ट्रिज सारख्या संस्थेकडून करण्यांत यावी असें चेंबरनें सुचविलें आहे. ग्रामीण भागांतील जनतेला व्यवसाय प्राप्त करून देण्यासाठी भारताच्या नियोजन–मंडळानें घरगुती धंदे आणि ग्रामोद्योग ह्या दोन्ही प्रकारचे उद्योगधंदे उभारण्यांत यावे असें आपलें मत व्यक्त केलें आहे. चेंबरनें नियोजन–मंडळाच्या ह्या सूचनेस पाठिंबा दिला आहे. राज्यांतील ग्रामीण अर्थव्यवस्था विकास पावली तरच खेडेगांवांतील नेहमींची बेकारी दूर होईल आणि लोकांच्या उत्पन्नांत भर पडेल, असें चेंबरनें आपल्या निवेदनांत म्हटलें आहे. भारतासारख्या कमी उत्पादन असणाऱ्या देशांत लोकांच्या रहाणीचें मान वाढविण्याचा हाच एक मार्ग आहे. उत्तर–प्रदेश सरकारनें कांहीं निर्वासितांना ग्रामोद्योगांसाठी कर्जें दिलीं आहेत. हीं कर्जें देण्यापूर्वी, चालू होणारे उद्योगधंदे तांत्रिक दृष्ट्या बळकट पायावर उभे आहेत कीं नाहींत ह्याची छाननी होणें आवश्यक आहे; नाहींतर सरकारचा पैसा निष्कारण वांया जाण्याचा संभव असतो. म्हणून बोर्ड ऑफ इंडस्ट्रीज सारख्या एखाद्या तज्ज्ञांच्या संस्थेकडून अर्जांची तपासणी करण्यांत यावी, अशी चेंबरनें केलेली सूचना योग्य अशीच आहे.

---

## वृत्तपत्रांचे वाचक काय वाचतात ?

पंजाब विद्यापीठाच्या वृत्तपत्रीय खात्यानें वृत्तपत्रांच्या पाकिस्तानांतील वाचकांना एक प्रश्नपत्रिका पाठवून त्यांचीं उत्तरें पाठवून

देण्याची विनंति केली आहे. दिलेलीं उत्तरें अर्थातच गुप्त ठेवण्यांत यजार आहेत. प्रश्न पुढीलप्रमाणें आहेतः—( १ ) पाकिस्तानांतील वृत्तपत्रांच्या सर्व-साधारण दर्जाबद्दल तुमचें काय मत आहे? ( ५० शब्दांत लिहा ). कोठलीं सदरें चालू केलीं तर तुम्हाला विशेष आवडतील? (२) तुम्ही अग्रलेख वाचतां काय? (३) व्यंगचित्रें नियमितपणें पहातां काय? (४) कोणत्या प्रकारची बातमी तुम्ही काळजीपूर्वक वाचतां? (अ) परदेशीय, (ब) राष्ट्रीय, (क) स्थानिक, (ड) व्यापारी, (ई) खेळांची? (५) गुन्हे आणि लैंगिक बातम्या ह्यांच्याकडे तुमचें लक्ष असतें काय? (६) तुम्हांला राजकीय बातम्या आवडतात कीं इतर बाबतींतील माहिती देणाऱ्या बातम्याच आवडतात? (७) तुम्ही ह्यापैकीं काय वाचतां? (अ) वाचकांचा पत्रव्यवहार, (ब) विनोदी स्तंभ, (क) निंदाप्रचुर लेख, (ड) ताज्या घडामोडी. वृत्तपत्रांत मुलांसाठीं, स्त्रियांसाठीं अगर सिनेमाविषयक वेगळीं पानें असावींत कीं ह्या विषयांचीं स्वतंत्र मासिकेंच असावींत? ह्याशिवाय तुम्हाला आणखी कांहीं सुचवावयाचें आहे काय?

प्रत्येक प्रश्नाचें उत्तर ज्या ठिकाणीं शक्य असेल त्या ठिकाणीं 'होय 'अगर' नाहीं' असें द्यावयाचें आहे. अशा तऱ्हेच्या प्रश्नपत्रिकेला दिलेल्या उत्तरांची छाननी करून वाचकवर्गाच्या आवडीनिवडींचा अंदाज घेणें उपयुक्त ठरेल.

### सहकारी ग्रंथप्रकाशन

सीलोनमधील ग्रंथकारांच्या उपयोगी पडण्यासाठी एक सहकारी प्रकाशन-संस्था लवकरच पुस्तकें प्रसिद्ध करण्याच्या कार्यास प्रारंभ करणार आहे. संस्थेच्या सभासदांपैकीं पुष्कळांनीं आपलीं हस्तलिखितें संस्थेच्या स्पेशल बोर्डाला सादर केलीं असून त्याच्या शिफारशींप्रमाणें ग्रंथ-प्रकाशन केलें जाणार आहे. आलेल्या हस्तलिखितांची तपासणी करण्याचेंच काम बोर्ड करणार आहे असें नव्हे; तर, ज्या होतकरू ग्रंथकारांना आर्थिक मदतीची जरूरी असेल त्यांना शक्य ती मदतहि करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें ग्रंथकारांनीं आपल्या ग्रंथाच्या किंमती किती ठेवाव्या ह्याविषयींहि बोर्ड सूचना करणार आहे. स्कॉट आणि थॅकरे ह्यांनीं लिहिलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांप्रमाणें सीलोनच्या इतिहासावर आधारलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या. लिहिणाऱ्यांना उत्तेजन देण्यांत येणार आहे. दुर्मिळ अगर महाग पुस्तकांच्या, लोकांना झेपण्यासारख्या आवृत्त्या काढण्याचाहि बोर्डाचा विचार आहे. आयुर्वेदावरील व इतर जुनीं पुस्तकें पुन्हा छापण्याचाहि इरादा आहे. स्वल्प किंमतींत पुस्तकें उपलब्ध करून देणें आणि ग्रंथकारांना उत्तेजन देणें, असे दोन प्रमुख उद्देश संस्थेनें आपल्या पुढें ठेवले आहेत. पुस्तकांच्या किंमती बेताच्या ठेवल्यामुळें ग्रंथांचा प्रसार जास्तींत जास्त वाचकांपर्यंत होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

---

गुजराथी ज्ञानकोश— गुजराथ विद्यापीठाच्या सेनेटनें गुजराथी भाषेंतील पहिला ज्ञानकोश तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठींतील पहिला ज्ञानकोश तयार करणारे कै. डॉ. केतकर ह्यांनीं जमविलेल्या एतद्विषयक सामग्रीचा वरील कामीं उपयोग करण्यांत येणार आहे असें समजतें.

**इराणशीं हवाई करार**—इराण आणि भारत ह्यांच्या दरम्यान एक हवाई वहातुकीसंबंधींचा करार करण्याचें ठरलें आहे. उभयता देशांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांत करारासंबंधीं नुकतींच बोलणीं होऊन एकमत झालें.

## औद्योगिक उत्पादनांत वाढ

### १९५१ मधील समाधानकारक प्रगति

भारतांतील औद्योगिक उत्पादन १९५० चे मानानें १९५१ मध्यें १०% वाढलें. गिरण्यांचें कापडाचे उत्पादन ११% वाढून तें ४०८ कोटी वार झालें. १९५१ मधील हातमागाच्या कापडाच्या उत्पादनाचा अंदाज ८० कोटी वारांचा आहे. सुताचें उत्पादन ११७ कोटी पौंडांवरून १३० कोटी पौंडांवर गेलें. पंचवार्षिक योजनेप्रमाणें, १९५५-५६ अखेर गिरण्यांचें उत्पादन ४५० कोटी वार झालें पाहिजे, हातमागांचें उत्पादन १९० कोटी वारांवर गेलें पाहिजे आणि १६० कोटी पौंड सूत तयार व्हावयास हवें. ह्याप्रमाणें उत्पादन सुधारल्यास, दर माणशीं १५ वार कापड वाट्यास येईल. तागाच्या मालाचें उत्पादन ८,७३,००० टन झालें; १९५० मध्यें तें ८,३७,००० टन होतें. १९४७ सालानंतरचें पोलादाचें सर्वांत जास्त उत्पादन १९५१ मध्येंच झालें; तें १०,४०,००० टन भरलें. येत्या तीन ते सात वर्षांत त्यांत ४,५०,००० टनांची वाढ होईल. कोळशाच्या उत्पादनानें ३·४ कोटी टनांचा नवा उच्चांक गाठला, तर सिमेंटचें उत्पादन २३% वाढून तें ३२ लक्ष टन झालें. येत्या तीन वर्षांत तें दरसाल १३ लक्ष टनांनीं वाढेल, अशा योजना आखण्यांत येत आहेत. कागदाच्या उत्पादनाची प्रगतीहि समाधानकारक आहे. सोडा ॲश, कॉस्टिक सोडा, लिक्विड क्लोरिन, ब्लीचिंग पावडर, बायक्रोमेटस, इत्यादींचें उत्पादन सुधारलें, पण सल्फ्युरिक ॲसिडच्या उत्पादनांत वाढ झाली नाहीं. मोटारींचे सुटे भाग जुळवून, १९५१ मध्यें २२,२५२ मोटारी तयार करण्यांत आल्या; १९५० मध्यें अशा रीतीनें १४,६०२ मोटारी बनविण्यांत आल्या होत्या. साबण १०%, रंग २३%, आगपेट्या १०%, एनॅमलचा माल ५०%, चहाच्या पेट्यांसाठीं प्लायवुड ४४%, शिवण्याचीं यंत्रें ३९%, हातकंदील ४०%, गॅसच्या बत्त्या ७०%, रेझरचीं पातीं १४०%, अशी इतर उत्पादनांत वाढ झालेली आहे.

### साखरेच्या उत्पादनाची व खपाची परिस्थिति

साखरेचें चालू वर्षीं उत्पादन १४,५०,००० टन होईल अशी अपेक्षा आहे. म्हणजे, साखरेच्या अपेक्षित खपापेक्षा तें ४,५०,००० टन अधिक होईल. १९५०-५१ च्या मोसमांत ११,०१,००० टन उत्पादन झालें होतें. सरकारनें दीड महिन्यापूर्वीं ५०,००० टन साखरेच्या निर्गतीस परवानगी दिली होती, परंतु निर्गत होऊं शकली नाहीं. कारण, भारताच्या साखरेची किमान किंमत जागतिक बाजारपेठेंतील इतर साखरेच्या कमाल किंमतीपेक्षां भारी आहे, असें साखरव्यापाऱ्यांचें म्हणणें आहे. गेल्या वर्षीं गुळाचे भाव साखरेच्या भावाचेहि वर गेल्यामुळें साखरेस मागणी वाढली. आतां परिस्थिति उलट आहे. गुळाची किंमत मणास ८ ते ९ रु. आहे, आणि साखरेची किंमत ३३ रु. आहे. साखरेची किंमत नियंत्रित दरापर्यंत उतरली तरी तिचा खप फारसा वाढणार नाहीं, आणि त्यामुळें साखर नियंत्रित दरानें कितीहि विकत मिळूं लागली तरी साखरेचा साठा लवकर हलूं शकणार नाहीं. १५ मे पर्यंत, साखरकारखान्यांतून ४·७ लक्ष टन साखर बाजारपेठेंत गेली व कारखान्यांच्या गुदामांत ९·६ टन साखर शिल्लक होती.

### पाकिस्तानी कंपनी-कायद्यांत दुरुस्ती

पाकिस्तानी कंपनी कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी पाकिस्तान सरकारनें एक कमिशन नेमण्याचें ठरविलें आहे.

## सोविएत युनियनमधील सहकारी संस्था

(ए. क्लिमोव, "सोविएत युनियन समाचार आणि विचार"मधें)

सहकारी संस्था या सोवियत युनियनमधील आर्थिक व सामाजिक संघटनांपैकीं प्रमुख होत. सध्यां २६,००० सहकारी संस्थांत ३,२५,००,००० भागीदार–सभासद आहेत.

### सहकारी संस्थांचें संघटनात्मक स्वरूप

सोविएत सहकारी संस्था एकसूत्री व्यवस्थेखालीं असतात. राज्यकारभाराच्या जिल्हाघटकानुसार सहकारी संस्थांचाहि जिल्हानिहाय संघ बनतो व पुढें प्रादेशिक, विभाग व प्रजासत्ताक असे संघ बनत जातात. प्रत्येक प्रजासत्ताकांतील सहकारी संस्था-संघ हें मुख्य केंद्र असतें. रशियन प्रजासत्ताकांतील प्रादेशिक व विभागसंघ हीं प्रमुख केंद्रें असून ते संघ मुख्य मध्यवर्ति संघटनेला सामील होतात. या मुख्य मध्यवर्ति संघटनेला "सेंट्रो-सोयुझ" असें नांव आहे.

प्रत्येक सहकारी संस्था ही स्वतंत्र, स्वावलंबी संस्था असून तिची स्वतःची मालमत्ता व फंड असतो व आपल्या व्यवहाराबद्दल ती मुखत्यार असते, व या सर्व बाबतींत सोविएत कायद्याचें पाठबळ तिला मिळत असतें.

सभासदांच्या (भागीदारांच्या) सर्वसाधारण सभेनें मंजूर केलेल्या नियमांनुसार सहकारी संघांचें कार्य चालतें. सोळा वर्षांवरील कोणत्याहि व्यक्तीला कुठलेहि भेदभाव आड न येता या सहकारी संस्थांचे सभासद बनतां येते; त्यासाठीं अल्प प्रवेश-फी भरली व ठराविक शेअर घेतला कीं पुरे.

### सहकारी संस्थांचा लोकशाही कारभार

सहकारी संस्था आपल्या क्षेत्रांतील सभासदांप्रमाणें बिन-सभासदांनाहि माल विकत देतात. भागीदारांना वार्षिक नफा मिळतो. हा नफा वार्षिक सभेंत ठरविण्यांत येतो.

सहकारी संस्थांचा सर्व कारभार व्यापक स्वरूपाच्या लोकशाही तत्त्वांवर आधारलेला असतो. सर्व कार्यकारी मंडळ, हिशेब तपासनीस हे गुप्तमतदान पद्धतीनें निवडलेले असतात आणि ते आपल्या कार्याबद्दल सभासदांना जबाबदार असतात; सर्व बाबतींत अखेरचा निर्णय सभासदांच्या हातीं असतो.

सहकारी संस्थेची सर्वश्रेष्ठ नियंत्रण–संस्था म्हणजे भागीदार सभासदांची सर्वसाधारण सभा. या सभेंत सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा निर्णय लावण्यांत येतो, व्यवस्थापक मंडळ व हिशेब-तपासनीस निवडण्यांत येतो. या निवडणुका दर दोन वर्षांनीं होतात. सर्वसाधारण सभेंत ठरलेल्या निर्णयांची अंमलबजावणी व्यवस्थापक मंडळ करते; या व्यवस्थापक मंडळाला आपल्या कार्याचा जाब सभासदांच्या सर्वसाधारण सभेला व वरच्या सहकारी संस्थासंघाला द्यावा लागतो.

हिशेबतपासनीस–मंडळ व्यवस्थापक वर्गाच्या सर्व आर्थिक व्यवहारावर देखरेख ठेवते व हिशेबाच्या चोपड्या तपासते. सहकारी संस्थेच्या दैनंदिन कार्यासाठीं—दुकान, भोजनालय, विश्रांतिगृह चालविण्यासाठी सहा महिन्यांच्या मुदतीपुरत्या कार्यकर्त्यांच्या तुकड्या निवडण्यांत येतात.

### वरिष्ठ सहकारी संघ

सहकारी संस्थेच्या सर्व कार्यांत सभासदांचे भरपूर सहकार्य लाभतें त्यामुळें त्यांनाहि सामुदायिक व्यवहाराची माहिती व अनुभव मिळत जातो.




सभासदांच्या प्रतिनिधीमंडळाची निवडणूक दर तीन वर्षांसाठी गुप्तमतदान पद्धतीनें सर्वसाधारण सभेंत होतें. सहकारी संस्थेची ही सर्वांत श्रेष्ठ समिति होय. या प्रतिनिधिमंडळामधून गुप्तमतदान पद्धतीनें दोन वर्षांसाठी व्यवस्थापक समितीची व हिशेबतपासनिसांची निवड होत असते.

प्रजासत्ताक, प्रदेश किंवा विभागांतील सहकारी संस्थासंघाची सर्वश्रेष्ठ समिति म्हणजे सहकारी संस्थांचा काँग्रेस होय. या काँग्रेसला प्रत्येक सहकारी संस्थांच्या प्रतिनिधिमंडळामार्फत प्रतिनिधी निवडून पाठविले जातात. ह्या काँग्रेस दर चार वर्षांनीं भरून त्या त्या संघाचा अहवाल व हिशेब मंजूर करतात व संघाचे चार वर्षांसाठी कार्यकारी मंडळ व हिशेब-तपासनीस मंडळ निवडतात व त्या त्या संघापुढील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेतात.

अशाप्रकारें मध्यवर्ति सहकारी संघटनेचीहि–सेन्ट्रो सोयुझचीहि काँग्रेस भरते व निवडणुका होतात.

### सहकारी संस्थांमार्फत व्यापाराची वाढ

सोविएत युनियनमधील व्यापार हें या सहकारीसंघाचें मुख्य कार्य. या सहकारीसंघाकडे २,५०,००० व्यापारी संस्था आहेत. त्यामध्यें २५,००० भोजनालयें, विश्रांतिगृहें आहेत. देशाच्या किरकोळ व्यापारांत या संस्थांना महत्त्वाचें स्थान आहे. या संस्थांचा व्यापार वाढत राहावा अशीच परिस्थिति सोविएत युनियनमध्यें आढळून येते. वाढत्या प्रमाणांत लोकोपयोगी माल दरसाल निर्माण होतो. राष्ट्रीय आमदनी वाढती आहे व लोकांचें उत्पन्नहि वाढत आहे आणि मालाच्या किंमती उतरविण्यांत येत असतात.

१९४० च्या मानानें १९५० ची किरकोळ विक्री १३७ टक्के व १९५० च्या मानानें १९५१ ची किरकोळ विक्री ११६ टक्के होती. अन्नवस्त्रादि नित्योपयोगी मालाबरोबरच मोटरगाड्या, मोटर सायकली, एंजिनें, कोळसा, पेट्रोल, रेडियो, शिवणयंत्रें, साग, सिमेंट असाहि माल सहकारी संस्था विकत असतात. सहकारी संस्थांना हा सर्व माल सरकारी कारखाने, सामुदायिक शेतें, उत्पादक सहकारी संघ आणि वैयक्तिक शेतकरी यांच्याकडून मिळतो. त्याखेरीज या सहकारी संस्थांचे ८,५०० लहानसहान कारखाने हे आहेत; त्यांचें उत्पादन १९४० च्या मानानें १९५० सालीं दुप्पट झालें होतें. सहकारी संस्था कच्चा मालहि खरेदी करतात व त्यांचीं स्वतःचीं शेतेंहि असतात.

### सहकारी संस्थांना भांडवल कोठून मिळतें?

प्रवेश फी, शेअर्स आणि व्यापारव्यवहारांतलें उत्पन्न हें सहकारी संस्थांचें मुख्य भांडवल. किंमतकपातीमुळें सहकारी

संस्थांचें फारसें नुकसान होत नाहीं, कारण विक्रीची त्यामुळें होणारी वाढ व उत्पादनखर्चांतली बचत यामुळें ती तूट भरून निघते. उत्पादनखर्च कमी करण्यासाठीं सर्व अनावश्यक खर्चाला काट देण्यांत येते. वहातूक व सांठवणीवरचा खर्च कमी करण्यांत येतो. मालाच्या ने–आणीचा खर्चहि दरसाल कमी कमी पडत जात आहे. जरी सहकारी संस्थांचा व्याप वाढता असला तरी गेल्या वर्षी हा खर्च एकंदर विक्रीच्या ९ टक्यांहून अधिक नव्हता.

सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांच्या ज्ञानांत, कार्यक्षमतेंत व उत्पादनकौशल्यांत सहकारी व्यवस्थेमुळें सतत सुधारणा होते; त्यांना पगार व बोनस असा मोबदला मिळतो त्यामुळें ही सुधारणा होते. ठराविक कार्यक्रमावरहुकूम विक्रीबद्दल पगाराच्या १० टक्के बोनस व त्याहून अधिक विक्रीबद्दल दर अधिक टक्यास दुप्पट पगार मिळतो.

### सहकारी संस्थेंतील कामाचें शिक्षण

सहकारी संस्थांच्या विविध कार्यक्षेत्रांत १०,००,००० लोक काम करतात. हे लोक कार्यकुशल असावे लागतात. त्यांच्या शिक्षणासाठीं सहकारी संस्थांनीं शिक्षणव्यवस्था केलेली आहे. उच्च सहकारी शाळा व उच्च सहकारी अभ्यासक्रम मध्यवर्ति सहकारी संघटनेनें–सेन्ट्रोसोयुजनें चालविले आहेत. खास तज्ञांचें शिक्षण सोविएत युनियनच्या उच्च शिक्षणखात्याकडे आहे. त्यांत संयोजक, अर्थशास्त्रज्ञ, हिशेबनीस, व्यवस्थापक अशांचें शिक्षण होतें. मध्यम श्रेणींतल्या कार्यकर्त्यांसाठीं ५९ माध्यमिक सहकारी शाळा आहेत. तेथें १८,००० विद्यार्थी शिकत आहेत व ३,००० पत्रव्यवहारानें शिक्षण घेत आहेत.

विक्रीचें शिक्षण देण्यासाठीं बारा व्यापारी शाळा आहेत. येथें दरसाल १४,००० विद्यार्थी शिक्षण घेतात. त्याखेरीज तीन महिन्यांचे छोटे अभ्यासक्रमहि आहेत.

या सर्व शिक्षणसंस्थांना आवश्यक असलेल्या शिक्षकवर्गाच्या शिक्षणासाठींहि मध्यवर्ति संघटनेमार्फत–सेन्ट्रोसोयु मार्फत उच्च अध्यापन संस्था चालविण्यांत येत असते. त्या संस्थेंत दाखल होण्यासाठीं व्यापार व अर्थशास्त्र यांतील उच्च शिक्षण व प्रत्यक्ष अनुभव आवश्यक असतो.

सर्व शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांना निवासव्यवस्था, क्रमिक पुस्तकें व शैक्षणिक साधनें मोफत मिळतात व शिवाय शिष्यवृत्तीहि. सहकारी संस्थांत काम करणाऱ्यांना शिक्षण चालू असतांना त्यांचा नेहमींचा पगारहि मिळत असतो. हा सर्व शिक्षणखर्च सहकारी संस्थांमार्फत होतो.

### दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर, लि.

" अर्थाच्या " ता. १४ मेच्या अंकांत वरील बँकेच्या प्रगतीसंबंधीं दिलेले कांहीं आंकडे चुकीचे असून, तिच्या १९५१ मधील नफ्याचा आकडा वस्तुतः बराच मोठा आहे आणि रिझर्व्ह व इतर फंड ह्यांची रक्कमहि ज्यास्त आहे. १९५१ सालीं बँकेस निव्वळ नफा ३१,९४२ रु. झाला; १९५० मध्यें तो २३,३०० रु. होता. ह्या नफ्यांतून रिझर्व्ह फंडांत ७,००० रु. व इनव्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंडांत ६,७२० रु. टाकण्यांत आले व ३% करमाफ डिव्हिडंड म्हणून ४,८७९ रु. नफा भागीदारांना वाटण्यांत आला. बँकेचें वसूल भांडवल १,६२,६५० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड आतां १,०९,००० रु. झाले आहेत.

( चेअरमन: शेठ चुनिलाल उर्फ बाबूभाई माशिंगजी परमार. व्हा. चेअरमन: शेठ एम. बी. लोहिया. मॅ. डायरेक्टर: गोपाळ गणेश भुसंडे. )


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.**

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी.
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.


बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.



## मध्यवर्ती अर्थखात्याचा १९५१–५२ चा अहवाल

मध्यवर्ती सरकारच्या कंट्रोलर ऑफ कॅपिटल इशूजनें १९५१ मध्यें भारतांत १५·०८ कोटी रुपयांपर्यंत परकीय भांडवल गुंतविण्यास मंजुरी दिली. याकरतां १५·१० कोटी रुपये भांडवल गुंतविण्याचे ९४ अर्ज या वर्षांत आले होते. त्यांतील १५·०८ कोटी रुपयांपर्यंतच्या ८१ अर्जास मंजुरी देण्यांत आली. याच कालांत ५९·५५ कोटी रुपये भारतीय भांडवल गुंतविण्याचीही परवानगी प्रस्तुत कंट्रोलरनीं दिली.

### जकात कारभारांत सुधारणा

महसूल खात्यास जकाती, प्राप्तीकर व अबकारी कर इत्यादींपासूनच सरकारचें एकूण उत्पन्न उभारावें लागत असून वर्षभरांत त्यास अनेक महत्त्वाचीं कामें पार पाडावीं लागलीं. त्यांतील एक काम म्हटलें म्हणजे जकात कारभारांत सुधारणा व चोरटी आयातप्रतिबंधक उपाय अधिक कडक करण्यासंबंधीं होते. नोव्हेंबर १९५१ मध्यें मुंबईंत झालेल्या कलेक्टर ऑफ कस्टम्स ॲण्ड लॅण्ड कस्टम्सच्या परिषदेंतील विचारविनिमयानुसार शिल्लक बाकी वसूल करण्यासाठी एक सर्वंकश मोहीम सुरू करण्यांत येऊन अशा प्रकारच्या सुसूत्र प्रयत्नांनीं परिस्थितींत बरीच सुधारणा झाल्याचें या अहवालांत म्हटलें आहे. या कामीं जनतेचें सहकार्य मिळविण्यास मुंबई, मद्रास व कलकत्ता या बंदरीं जकात सल्लागार समित्यांची स्थापना करण्यांत आली आहे. तसेंच, मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील प्रमुख कस्टम्स हाऊसमध्यें जनता–संबंध-अधिकारी नेमण्यांत आले असून ही व्यवस्था कलकत्ता व दिल्ली येथील सेंट्रल एक्साइज कलेक्टोरेटसूच्या जमीन जकात विभागासही लागू करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे.

### चोरटी आयातप्रतिबंधक उपाययोजना

या वर्षांत चोरटी आयातप्रतिबंधक उपाययोजना अधिक कडक करण्यांत येऊन जकात अधिकाऱ्यांनीं सुमारें १ कोटी रुपयांचा माल पकडला. छोटीं हत्यारें व वायरलेस सेटस् असलेल्या जलद गतीच्या लॉंचेस व अशाच प्रकारें सुसज्ज केलेल्या जीप गाड्यांची एक फलटण उभारण्याची एक योजना आंखण्यांत येऊन त्याची अंमलबजावणी होत आहे. पांडेचरी–कालिकत सीमेवर सुमारें २६॥ मैल लांबीचें कांटेरी तारेचें कुंपण थोड्याच कालांत उभारण्यांत येण्याची अपेक्षा आहे.

### अफूवर नियंत्रण

ठराविक कालांत शास्त्रीय आणि वैद्यकीय कारणाव्यतिरिक्त देशांत सर्वत्र अफू वापरण्यास बंदी करण्याचें सरकारचें धोरण या वर्षी अंमलांत आणलें गेलें. ठरवून दिलेल्या प्रमाणापेक्षां जास्त अफूचा वापर असलेल्या राज्यांनीं आपल्या गरजा हळूहळू कमी करून त्या चार वर्षांत ठरलेल्या प्रमाणांत आणण्याचें कबूल केलें आहे

वैद्यकीय आणि शास्त्रीय बाबीकरितां भारतीय अफूच्या वाढत्या मागणीचा उल्लेख अहवालांत केला असून खरेदीदारांस भारतीय अफूचा दर्जा आणि त्याचप्रमाणें भारताच्या व्यापाराच्या पद्धती इतर देशांशीं तुलना करतां आवडत्या असल्याचें त्यांत नमूद केलें आहे. संयुक्त राष्ट्राच्या मादक पदार्थ मंडळाच्या सहाव्या परिषदेसाठीं या देशाच्या प्रतिनिधीची अध्यक्षपदीं फेरनिवड झाल्यानें वैद्यकीय आणि शास्त्रीय गरजांसाठी लागणाऱ्या अशा मादक पदार्थांच्या उत्पादनावर मर्यादा घालण्याच्या प्रश्नावर जागतिक मंडळांत भारताच्या मतास मान्यता मिळाल्याचें या अहवालांत पुढें म्हटलें आहे.

### छुपें उत्पन्न शोधून काढलें

प्राप्तिकराच्या बाबतींत महसूल गोळा करण्याचें आणि बाकी वसूल करण्याचें नेहमींचें काम उरकून त्याबरोबरच छुपें उत्पन्न उजेडांत आणण्याची केलेली कामगिरी, हें या वर्षांतील विशेष वैशिष्ट्य होय. मे, १९५१ मध्यें चालू केलेल्या स्वखुषीनें असें उत्पन्न जाहीर करण्याच्या मोहिमेमुळें ६५·४६ कोटी रुपयांचें उत्पन्न उजेडांत आलें. जवळजवळ अशीं ८० टक्के प्रकरणें मार्च १९५२ अखेरीपर्यंत निकालांत काढण्यांत आलीं. २२ ऑक्टोबर १९५१ रोजीं ही खास मोहीम संपली असली तरी कर आकारणीच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें उत्पन्न जाहीर करण्याची करपात्र इसमांना मोकळीक आहे, असें अहवालांत म्हटलें आहे. स्वखुषीनें उत्पन्न जाहीर करण्याच्या या योजनेच्या जोडीस प्राप्तिकर चौकशी मंडळानेंही १९५१ अखेरीपर्यंत ३२ कोटी रुपये छुपे उत्पन्न उजेडांत आणलें.

### पंचवार्षिक योजनेसाठी भांडवल

पंचवार्षिक योजना आणि कोलंबो योजना यांखालीं आंखलेल्या विकासाच्या कार्यक्रमासाठी भांडवलाची केलेली व्यवस्था ही एकॉनॉमिक अफेअर्स डिपार्टमेंटची या वर्षांतील महत्त्वाची कामगिरी होय. या वर्षांत 'इंटरनॅशनल एड कोऑर्डिनेशन युनिट' या नांवानें एक स्वतंत्र विभाग चालू करण्यांत आला असून त्याजकडे परदेशांकडून भारतास मिळणाऱ्या आर्थिक व तांत्रिक साह्यांत अेकसूत्रीपणा आणण्याचें काम सोंपविण्यांत आलें आहे. या वर्षांत कोलंबो योजनेन्वयें ऑस्ट्रेलिया, कानडा आणि न्यूझीलंड या देशांकडून तसेंच अमेरिकेकडून मिळालेली मदत आणि सर्व ठिकाणांहून मिळालेलें तांत्रिक साह्य या सर्वांची या विभागानें व्यवस्था केली.

भारताची पौंडी गंगाजळींतील शिल्लक ब्रिटिश सरकारनें देण्यासंबंधीं या वर्षी एक करार झाला. या करारानुसार १ जुलै १९५१ पासून पुढील सहा वर्षेपर्यंत दर वर्षी ३·५ कोटी पौंड मोकळे करण्याच्या तरतुदीखेरीज ब्रिटिश सरकारनें खातें क्र. २ मध्यें असलेलें ३१ कोटी पौंड क्र. १ च्या (किंवा चालू) खात्यावर घेण्याचें कबूल केलें आहे. सहा वर्षांच्या मुदतीनंतर खातें क्र. २ मध्यें शिल्लक राहिलेली रक्कम आपोआपच चालू खात्यावर जमा करण्यांत येईल असेंही मान्य करण्यांत आलें.

### परकीय हुंडणावळीचें नियमन

१९४७ च्या परकीय हुंडणावळी नियमन कायद्यांतील कांहीं उणीवा काढून टाकून त्यांतील दंडाबाबतच्या तरतुदींची पुरेशा प्रमाणांत अंमलबजावणी करतां यावी आणि भारतीय औद्योगिक संस्थांच्या परदेशीय शाखांवर रिझर्व्ह बँकेचें अधिक प्रमाणावर नियंत्रण बसावें या हेतूनें या वर्षांत एका वटहुकुमान्वयें सदरहू कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. या वटहुकुमाऐवजीं नंतर कायदा संमत करण्यांत आला.

नाणी आणि चलनाचे बाबतींत महत्त्वाची घटना म्हटली म्हणजे अलिपूर येथें २·३५ कोटी रुपये खर्चून उघडण्यांत आलेली सरकारी टांकसाळ ही होय. आपल्या नेहमींच्या कामाबरोबरच देशांतील टांकसाळींनीं सीलोनकरतांही नाणी पाडून दिलीं.

याच ठिकाणीं सुमारें ६० लाख रुपये खर्चून सुरू केलेला रुपें शुद्ध करण्याचा कारखाना उभा करण्याचें काम या वर्षीही चालू राहिलें. हा कारखाना पूर्ण झाल्यावर तो पूर्वेंत सर्वांत मोठा असेल.

आणि तेथें गेल्या महायुद्धांत सुरू केलेल्या चतुरपरिणामक नाण्यांतील चांदी काढण्याचें काम सुरू करण्यांत येईल. या नाण्यांऐवजीं आतां निकलचीं नाणीं सुरू करण्यांत आलीं आहेत.

**खाजगी उद्योगधंदेवाइकांस साह्य**

खाजगी उद्योगधंद्यांची वाढ आणि स्थलांतरितांची पुनर्वसाहत करून देण्यासाठीं स्थापण्यांत आलेल्या दोन कार्पोरेशनमार्फत साह्य देण्याचें काम या वर्षींहि चालू होतें. दि इंडस्ट्रिअल फायनान्स कार्पोरेशननें मार्च १९५२ अखेर निरनिराळ्या औद्योगिक धंद्याकरितां कर्जाच्या स्वरूपांत सुमारें ११·९१ कोटी रुपये मदत दिली आहे. तसेंच निरनिराळ्या राज्यांनीं आपापल्या अधिकार क्षेत्रांतील अशीं कार्पोरेशन्स स्थापण्याचा अधिकार देणारें एक बिलहि संसदेनें सम्मत केलें. पुनर्वसाहत अर्थकारभारमंडळानें मार्च १९५२ अखेर स्थलांतरितांसाठीं ८·२५ कोटी रुपये मंजूर केले होते. त्यांतील ४१६ कोटी रुपये स्थलांतरितांनीं उसने घेतले आहेत. अशा प्रकारें दिलेल्या कर्जातून सुमारें ८२ हजार स्थलांतरितांची सोय होऊन आणखी १,५५,००० जणांच्या पुनर्वसाहतीस मदत होईल असा अंदाज आहे.

**पोस्टल सेव्हिंग्ज बँक**

पोस्टल सेव्हिंग्ज बँकेतून पैसे काढण्याच्या अधिक सोई यावर्षीं करण्यांत आल्या. १९५० मध्यें एका खातेसमितीनें अशा बँकांच्या कामकाजासंबंधीं केलेल्या अहवालावर सरकारनें विचारविनिमय करून या समितीनें केलेल्या अनेक शिफारशींचा स्वीकार केला व त्या शिफारशींची अहवालाच्या वर्षांत अंमलबजावणी झाली आहे. या शिफारशींत चेक्स व ड्राफ्ट ह्यांची सोय व ठराविक विभागांत चेक्स देऊन पैसे काढणें इत्यादींचा समावेश होतो. एका माणसाच्या खात्यावरील ठेवीच्या रकमेची कमाल मर्यादा १० हजार रुपयांपासून १५ हजार रुपयांपर्यंत आणि संयुक्त खात्यावर ३० हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यांत आली आहे.

---

**एंजिनिअरिंगचें शिक्षण घेणारे अधिक**— अमेरिकेंतील विद्यापीठांतून आणि कॉलेजांतून सध्यां १,१३८ भारतीय विद्यार्थी शिकत आहेत. त्यांपैकीं ३५२ विद्यार्थी एंजिनिअरिंगचें शिक्षण घेत आहेत. इतर विषयांचें शिक्षण घेणाऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणें आहे. सामाजिक शास्त्रें १५९, निसर्गविषयक शास्त्रें ९८, व्यापारउदीम ४८, शिक्षण ५८, शेती ६३, प्राग‍तिक शिक्षण २६, प्री-मेडिकल ४, जनरल मेडिसिन १०, सार्वजनिक आरोग्य ७, दंतविद्या ६, शुश्रूषा ४, कला १२. इतर २९३.

**१९५१ मधील परकीय प्रवासी**— १९५१ सालीं भारतांत एकूण २०,००० परकीय प्रवासी आले. त्यांपैकीं ३,६९९ अमेरिकन होते. गेल्या तीन वर्षांत भारतांत प्रवासाला येणारांची संख्या वाढत गेल्याचें दिसून आलें आहे. प्रवाशांपासून झालेल्या उत्पन्नाची नमुन्यादाखल म्हणून एक तपासणी रिझर्व्ह बँक करणार आहे.

**पुस्तकांची बहुमोल देणगी**— भारताच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीला अमेरिकेचे भारतामधील वकील मि. चेस्टर बौल्स ह्यांनीं १२० पुस्तकांची देणगी दिली आहे. हीं पुस्तकें वॉशिंग्टन येथील नॅशनल ब्यूरो ऑफ स्टँडर्सनें प्रकाशित केलीं असून तीं शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांवरील आहेत. मि. बौल्स ह्यांनीं ह्याप्रसंगीं प्रयोगशाळेच्या कार्याबद्दल उत्तेजनपर उद्गार काढले.

## आजची मंदी व सहकारी संस्था

**( भा. म. का. )**

फेब्रुवारी अखेरपासून सुरू झालेल्या मंदीचा असा एक अनुभव आला आहे कीं वस्तूंचे घाऊक स्वरूपाचे भाव उतरले परंतु त्या प्रमाणांत सामान्य गिऱ्हाइकाचा बाजारांत ज्या विक्रेत्याशीं संबंध येतो त्यानें विक्रीमालाचे भाव योग्य प्रमाणांत उतरविलेले नाहींत. यामुळें घाऊक व्यापारी-खरेदीदारांना मालाच्या खरेदींत तो कांहींसा स्वस्त मिळाल्यामुळें फायदा होत असला तरी तो किरकोळ खरेदीदारापर्यंत पोंचत नाहीं. साखर, खोबरेल तेल, कापड इ. किरकोळ नेहमींच्या व्यवहारांत उपयोगी पडणाऱ्या वस्तूंच्या बाबतींत हा अनुभव बऱ्याच ठिकाणीं येत आहे. तेव्हां उतरलेल्या भावांचा सामान्य जनतेला फायदा कसा मिळावा हा मुख्य प्रश्न आहे. बाजारभाव ठोक प्रमाणांत उतरले कीं किरकोळ खरेदीदारांपर्यंत ते पोंचण्याला कांहींदिवस जाणार हें कदाचित समर्थनीय ठरेल. परंतु भाव उतरले तरी तेवढ्या प्रमाणांत किंवा योग्य प्रमाणांत किरकोळ विक्रेते मालाचे भाव उतरवीत नाहींत हें समर्थनीय ठरत नाहीं. किरकोळ मालासाठीं अडलेले गिऱ्हाईक बाजारभाव उतरेल म्हणून जास्त काळपर्यंत वाट पाहूं शकत नाहीं. खोबरेल तेल किंवा मसाल्याचे किरकोळ पदार्थ, गोडें तेल, साखर इ. वस्तूंची दर-आठवड्याला किंवा हातांत पैसा असेल अशा वेळीं खरेदी करणारें गिऱ्हाईक फार मोठें असतें. अशा गिऱ्हाइकाला फार वेळ थांबतां येत नाहीं. कापडासारख्या वस्तूसाठीं अशा प्रकारचें गिऱ्हाईक कदाचित् कांहीं दिवस थांबूं शकेल. गरीब गिऱ्हाइकाला बाजारभाव उतरेल हें माहीत असलें तरी त्याचा फायदा घेण्यासाठीं फार दिवस वाट पाहतां येत नाहीं. ही परिस्थिति दूर करण्यासाठीं सहकारी चळवळीचें कार्यक्षेत्र वाढवितां येण्यासारखें आहे. शहरांतून व खेडेगांवांतून किरकोळ माल खरेदी करणारांच्या संस्था निघाल्या पाहिजेत. सध्यां अशा प्रकारच्या सहकारी संस्था विशेषतः शहरांतून व त्याहि अल्प प्रमाणांतच, आढळून येतात. परंतु अशा माल खरेदीसाठीं सहकारी संस्था सर्व ठिकाणीं व अगदीं गरीब जनतेपर्यंत पसरतील तरच उतरत्या बाजारभावांचा जास्तींत ज्यास्त फायदा गरिबांना मिळूं शकेल. आजच्या मंदींत सहकाराच्या तत्त्वाच्या प्रसारासाठीं एक चांगली संधि प्राप्त झाली आहे असें दिसतें. तरी या दृष्टीनें माल खरेदीदारांच्या सहकारी संस्थांचा प्रसार आजच्या परिस्थितीचा फायदा घेऊन करतां येईल कीं काय हीं विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

---

**ग्वाटेमालामधील बँका संकटांत**— द. अमेरिकेंतील ग्वाटामाला सरकारनें शेतकी-सुधारणेच्या कांहीं योजना जाहीर केल्या होत्या. परंतु ह्या सुधारणांच्या निषेधार्थ बँकेच्या खातेदारांनीं आपल्या रकमा काढून घेण्यास सुरवात केली. सुमारे ७ लक्ष स्टर्लिंग पौंड रक्कम अशा तऱ्हेनें काढून घेण्यांत आली. ह्या तडाख्यांत बँक ऑफ लंडन अँड साऊथ अमेरिका, हीहि सांपडली आहे.

**राजस्थानमधील मुलांची संख्या**—राजस्थान राज्यांत शाळेंत जाण्यास योग्य अशा वयाचीं सुमारें २२ लाख मुलें असून त्यांपैकीं १४ टक्के मुलें शिक्षणाच्या सवलतींचा लाभ घेत आहेत. येत्या दहा वर्षांत वरील मुलांपैकीं ८६ टक्के मुलांना शिक्षण देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.